महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक : १४७७(२)/२०१९/१४-अ | दिनांक : १७ जानेवारी, २०२०

# घोषणा
# मुलाखत कार्यक्रम
# राज्य सेवा मुख्य परीक्षा- २०१९
## (जाहिरात क्रमांक : ०७/२०१९)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी जाहिर करण्यात आला असून मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी या परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) देण्याकरीता त्यांच्या प्रोफाईलमध्ये लिंक ओपन करुन दिली आहे. त्यानुसार संबंधीत उमेदवारांनी पसंतीक्रम विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर केलेले पसंतीक्रमच विचारात घेण्यात येतील, अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत तोच क्रम, पसंतीक्रम म्हणून ग्राहय धरण्यात येईल. याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने/पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. याबाबीची संबंधित उमेदवारांनी विशेषत्वाने नोंद घ्यावी.

ठिकाण : मुंबई

उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवाआयोग